# कोरडवाहू क्षेत्रातील रब्बी पीक नियोजन

डॉ. आदिनाथ ताकटे

**यंदा बहुतांश भागात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पावसाचे पाणी शेतात साचून राहिल्याने रब्बी पेरणीस विलंब होणार आहे. सद्यःस्थितीत जमिनीत वाफसा येताच जमीन लागवडीयोग्य तयार करून रब्बी पिकांच्या पेरण्या त्वरित उरकून घेणे आवश्यक आहे.**

राज्यातील एकूण लागवडीयोग्य जमिनीपैकी ८० टक्के शेती ही पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर म्हणजेच निसर्गावर अवलंबून आहे. या कोरडवाहू (अवर्षण प्रवण) भागातील पावसाचे प्रमाण कमी, अनियमित आणि लहरी असल्यामुळे पीक उत्पादन हे अनिश्चित स्वरूपाचे असते. कोरडवाहू क्षेत्रातील पिकांचे नियोजन करताना उत्पादन वाढीच्या दृष्टीने विविध सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे. कोरडवाहू क्षेत्रात उपलब्ध पाण्याचा विचार करून हंगामातील घ्यावयाची पिके, पीक पद्धती, पेरणीची वेळ, बियाणे निवड, बीजप्रक्रिया, खत व्यवस्थापन तसेच ओलाव्याचे नियोजन आदी बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

सर्वसाधारणपणे कोरडवाहू रब्बी हंगामातील पिकांची पेरणीचा ही सप्टेंबरच्या मध्यापासून ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत करता येते. मात्र यंदाचा विचार करता, बहुतांश भागात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण झाली होती. काही ठिकाणी पावसाचे पाणी शेतात साचल्याने रब्बी हंगामाच्या दृष्टीने आवश्यक शेती कामे करणे शक्य झाले नाही. त्यामुळे रब्बी हंगामातील पिकांच्या लागवडी लांबण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी शेताचे पावसाचे पाणी साचून राहिल्यामुळे जमीन लागवडीयोग्य होण्यास विलंब होणार आहे. या बाबींचा विचार करता सद्यःस्थितीत वाफसा येताच जमीन लागवडीयोग्य तयार करून लवकरात लवकर रब्बी पिकांच्या पेरण्या उरकून घेणे आवश्यक आहे.

## हरभरा

### लागवडीसाठी वाण

- **देशी वाण :** विजय, दिग्विजय, फुले विश्वराज, फुले विक्रम
- **काबुली वाण :** विराट, कृपा पी.के.व्ही २, पीकेव्ही ४
- **कम्बाईन हार्वेस्टरने काढणीस योग्य वाण :** फुले विक्रम, पीडीकेव्ही कनक.

### बियाणे प्रमाण : (प्रति हेक्टरी)

- लहान आकार असलेल्या वाणासाठी : ६५ ते ७० किलो
- टपोऱ्या दाण्याचे वाण : ८५ ते १०० किलो
- जास्त टपोऱ्या दाण्याचे वाण (काबुली): १२५ ते १३० किलो

### पेरणी

- बागायती : २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर पर्यंत पूर्ण करावी, उशिरात उशिरा १५ डिसेंबरपर्यंत बागायती पेरणी करून घ्यावी.



कम्बाईन हार्वेस्टरद्वारे काढणी करता येणारे हरभऱ्याचा पीडीकेव्ही कनक वाण.

### पेरणीचे अंतर

- **देशी वाण :** ३० बाय १० सेंमी
- **काबुली वाण :** ४५ बाय १० सेंमी

### खत व्यवस्थापन

- शेवटच्या वखरणीच्या वेळी ५ टन शेणखत जमिनीत मिसळावे.
- पेरणीच्या वेळी नत्र, २५ किलो, स्फुरद ५० किलो आणि पालाश ३० किलो प्रति हेक्टरी म्हणजे अंदाजे एक गोणी युरिया, सहा गोण्या एसएसपी व एक गोणी एमओपी दोन चाड्याच्या पाभरीने द्यावे. किंवा १२५ किलो डीएपी आणि ५० किलो एमओपी खताची मात्रा पेरणीच्या वेळी बियाणालगत दुचाडी पाभरीने पेरून द्यावे.

### बीजप्रक्रिया

- प्रति किलो बियाणांस २ ग्रॅम थायरम किंवा ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रमाणे चोळावे. त्यानंतर रायझोबिअम व पीएसबी प्रत्येकी २५ ग्रॅम प्रमाणे या जैविक खतांची गुळाच्या थंड द्रावणामध्ये मिसळून बीजप्रक्रिया करावी.

### पाणी व्यवस्थापन

- जमिनीत ओलावा खूप कमी असेल आणि एखादे पाणी देणे शक्य असेल तर पिकाला फुले येऊ लागताच पाणी द्यावे.



रब्बी ज्वारी लागवडीसाठी जमिनीच्या प्रकारानुसार योग्य वाणाची निवड करावी.

## रब्बी ज्वारी

### वाण

जमिनीच्या प्रकारानुसार,

- **हलकी जमीन (खोली ३० सें.मी पर्यंत) :** फुले अनुराधा, फुले माऊली, फुले यशोमती
- **मध्यम जमीन (६० सें.मी. पर्यंत) :** फुले सुचित्रा, फुले चित्रा, फुले माऊली, परभणी मोती, मालदांडी ३५-१
- **भारी जमीन (६० सें.मी.पेक्षा जास्त) :** फुले वसुधा, फुले यशोदा, सीएसव्ही-२२, पीकेव्ही-क्रांती, परभणी मोती, परभणी सुपर.
- **हुरड्यासाठी :** फुले मधुर

**बियाणे:** हेक्टरी १० ते १२ किलो.

**पेरणीचे अंतर :** ४५ सेंमी बाय १५ ते २० सेंमी

### खत व्यवस्थापन

- शेवटच्या वखरणीच्या वेळी ५ टन शेणखत जमिनीत मिसळावे.
- पेरणीच्या वेळी नत्र ५० किलो, स्फुरद २५ किलो आणि पालाश २५ किलो प्रति हेक्टरी म्हणजे अंदाजे दोन गोणी युरिया, तीन गोण्या एसएसपी व एक गोणी एमओपी खतमात्रा दोन चाड्याच्या पाभरीने द्यावे.

### बीजप्रक्रिया

प्रति किलो बियाणास ४ ग्रॅम गंधक चोळावे. त्यानंतर ॲझोटोबॅक्टर व पीएसबी २५ ग्रॅम प्रत्येकी प्रमाणे जैविक खतांची बीजप्रक्रिया करावी.

### पाणी व्यवस्थापन

- कोरडवाहू ज्वारीस संरक्षित पाण्याची सोय असल्यास पीक गर्भावस्थेत असताना पेरणीनंतर २८ ते ३० दिवसांनी किंवा पीक पोटरीत असताना ५० ते ५५ दिवसांनी द्यावे.
- दोन पाणी देणे शक्य असल्यास वरील दोन्ही नाजूक अवस्थेत पिकाला पाणी द्यावे.

## करडई

- **वाण :** एसएसएफ ६५८, एसएसएफ ७०८, फुले करडई, फुले चंद्रभागा ,नारी-६, नारी एन एच -१ (बिगर काटेरी वाण)
- **बियाणे प्रमाण :** हेक्टरी १० ते १२ किलो
- **पेरणीचे अंतर :** ४५ बाय २० सेंमी

### खत व्यवस्थापन

- शेवटच्या वखरणीच्या वेळी ५ टन शेणखत जमिनीत मिसळावे.
- पेरणीच्या वेळी नत्र ५० किलो, स्फुरद २५ किलो प्रति हेक्टरी म्हणजे अंदाजे दोन गोणी युरिया व तीन गोण्या एसएसपी दोन चाड्याच्या पाभरीने द्यावे.

### बीजप्रक्रिया

- प्रति किलो बियाणास २.५ ग्रॅम थायरम चोळावे. त्यानंतर ॲझोटोबॅक्टर व पीएसबी प्रत्येकी २५ ग्रॅम याप्रमाणे जैविक खतांची बीजप्रक्रिया करावी.

### पाणी व्यवस्थापन

- करडई हे पीक अवर्षण प्रतिकारक असल्यामुळे या पिकाच्या वाढीस पाणी कमी लागते.
- मध्यम ते भारी जमिनीत पुरेसा ओलावा असल्यास करडईच्या पिकास पेरणी नंतर पाणी देण्याची गरज भासत नाही.
- सिंचनाची सोय असेल तर पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी जमिनीस तडे जाण्यापूर्वी एक संरक्षित पाणी देणे अधिक चांगले. दुसरे पाणी पीक फुलोऱ्यात येताना ५५ ते ६० दिवसांनी द्यावे. पिकास पाण्याचा जास्त ताण पडू देऊ नये.
- जमिनीस भेगा पडल्यानंतर पाणी दिले असता पाणी जास्त प्रमाणात जमिनीत मुरते. जास्त पाण्यामुळे पीक मोठ्या प्रमाणात मर रोगास बळी पडते. म्हणून करडई पिकास हलके पाणी देणे योग्य ठरते.

- डॉ. आदिनाथ ताकटे ९४०४०३२३८९
(कोरडवाहू शेती संशोधन केंद्र, सोलापूर)

छोट्या जाहिराती

क्लासिफाइड: सहा ओळींसाठी फक्त ५०० रुपये, पुढील प्रत्येक जादा ओळीस रु. ८५/-

विशेष योजना: २ पेड + १ फ्री, ३ पेड + २ फ्री, ५ पेड + ५ फ्री, १० पेड + १२ फ्री

खते / औषधे

खते/ औषधे निर्मिती/ वितरण

Biostimulants, Fertilizer DRC (WS, Import,Micronutrients, Organic, Pesticides, Biofertilizer, Co-Marketing) उत्पादने विक्रीसाठी लागणाऱ्या FCO MRC DRC परवान्यासाठी फाईल कागदपत्रे तयार करणे, Online Application,परवाना मिळेपर्यंत मार्गदर्शन व मदत नाममात्र शुल्कात केले जाईल, तसेच वरील सर्व खतां साठी लागणारा कच्चामाल कमी दरात उपलब्ध करून दिला जाईल 8857978275 ॲग्रोसेंट्रल पुणे

शेतीविषयक अन्य विषय

शेतीसाहित्य

मल्चिंग पेपर (रेडीमेड होल). रेडीमेड होल असणारे मल्चिंग पेपर सर्व साईज मध्ये मिळेल (एस. टी पार्सलची सोय) ड्रीप सबमेन साठी पी.व्ही.सी पेक्षा स्वस्त एच.डी.पी.ई पाईप (२ वर्ष गॅरंटीसह) मिळेल. रेनपाईप, एच.डी.पी.ई पाईप, मल्चिंग पेपर डिलरशिप देणे आहे. संपर्क : पल्लवी ठिबक सिंचन, फोन. ९७६४२७८८८६, ९०२१२३४२३४

पशुधन व्यवसाय

कुक्कुटपालन / पोल्ट्री

ताडपत्री, शेती पोल्ट्री, साठी वल्डक्लास उन्हात लवकर खराब न होणारी, ना लवकर फाटणारी, ना कोटिंग, निघणारी ढोबळे तारपोलिन वाशी नवी मुंबई ९७७३९६९६६५.

व्यवसायविषयक

व्यवसाय धंदा

ॲग्रो कंपनीला महाराष्ट्रातील प्रमुख ठिकाणी किसान मार्ट (खते, बी-बियाणे, किटकनाशके आणि सल्ला सेवा, शेतमाल खरेदी-विक्री) सुरू करण्यासाठी भागीदार पाहिजे. संपर्क - 7588063099, 8380922284.

नोकरीविषयक

नोकरी देणे

प्रचंड नफ्यात चालणाऱ्या ॲग्रो कंपनीला कमिशन एजंट भागीदार गुंतवणूकदार पाहिजेत. नफा आठव ड्याला, महिन्याला मिळेल. बाजार मार्ट. 7738625951 / 8828498677 / 7499170440.

वाचकांसाठी निवेदन

सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत 'सकाळ' व्यवस्थापन हमी देऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.
-वरिष्ठ व्यवस्थापक, ॲग्रोवन

जाहिरातीसाठी संपर्क

- पुणे - शितल - ९१७५७६५८३८
- सातारा- अजिंक्य-८९५६१३२५१५
- सांगली -शितल- ९८८११२१२१३
- नाशिक- चेतन-९१६८६६११५८
- छ. संभाजीनगर- दत्ता८६२४०२३२५६
- अहमदनगर-मारुती- ८३९०५६१५१३
- नागपूर - प्रशांत- ८८८८७१८६००
- अकोला - महेश-९०११०६१९३३
- जळगाव- भूषण-९१६०४११११६
- सोलापूर - रोहित-९६५७३६०३४६

ॲग्रोवन, सकाळ मिडिया प्रा. लि. ५९५, बुधवार पेठ, पुणे ४११००२

फोन ०२० - २४४०५४४८/४५, Email - advt.agrowon@esakal.com